



दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ६१ वा ● बुधवार १७ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 61 | Date : 17/07/2024 blow Wednesday, Page 4 Price 4







## ‘पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी’ उपक्रमाचा समारोप

### पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ‘एक वारकरी एक झाड’ ही संकल्पना राबवून पालखी मार्गावर वृक्षारोपण करण्याचा संकल्प करूया : मुख्यमंत्री



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी : वातावरणातील बदलामुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ‘एक वारकरी एक झाड’ ही संकल्पना राबवून पालखी मार्गावर वृक्षारोपण करण्याचा सर्वांनी संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी’ या आळंदी ते पंढरपूर पायी वारीच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी यावेळी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. तानाजी सावंत, आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ.अविनाश ढाकणे, संचालक नितीन गोरे, सिद्धांत कदम, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, महाराष्ट्र कला संस्कृती मंचचे ह.भ.प. ज्ञानेश्र्वर महाराज वाबळे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले वातावरणात झालेल्या बदलामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने ‘पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी’ **। पान २ वर**

## पंढरपुरात विठू नामाचा गजर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपत्निक शासकीय महापूजा संपन्न..



**मुख्यमंत्र्यांसोबत मानाचे वारकरी म्हणून शेतकरी बाळू शंकर अहिरे (वय ५५ वर्षे) आणि त्यांची पत्नी आशाबाई बाळू अहिरे (वय ५० वर्षे) मु. पो. अंबासन, ता. सटाणा जि. नाशिक यांना महापूजेचा मान मिळाला. ते मागील १६ वर्षापासून नियमितपणे वारी करत आहेत.**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः राज्यासह देशभरातील सर्व वारकरी व विठुरायाचे भक्त गेल्या काही दिवसांपासून ज्या दिवसाची आतुरतेने वाट पाहात होते तो सोनियाचा दिवस उजाडला आहे. सर्व वारकरी आषाढी एकादशीची वाट पाहत असतात. आज तो दिवस उजाडला असून गेल्या काही दिवसांपासून दिंड्या-पताका घेऊन पंढरपूरच्या दिशेने निघालेले वारकरी देखील पंढरपुरात दाखल झाले आहेत. दुसऱ्या बाजूला आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात श्री विठ्ठलाची शासकीय महापूजा देखील संपन्न झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सपत्निक (लता शिंदे) ही शासकीय महापूजा पार पाडली. भाविकांची विक्रमी गर्दी, टाळ मृदुंगाचा जयघोष, **। पान २ वर**

## दोन आठवड्यांत उत्तर सादर करा; अजित पवार गटाला सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्षनाव व घड्याळ हे निवडणूक चिन्ह अजित पवार गटाला बहाल केल्याविरोधात शरद पवार गटाने दिलेल्या आव्हानावर दोन आठवड्यांमध्ये उत्तर सादर करावे, असे आदेश मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अजित पवार गटाला दिले. यासंदर्भातील पुढील सुनावणी ६ ऑगस्ट रोजी होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील फुटीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार गट हाच मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा निर्वाळा दिला होता व घड्याळ हे निवडणूक चिन्ह बहाल केले होते.

त्याविरोधात शरद पवार गटाने आव्हान दिले आहे. यासंदर्भात मंगळवारी न्या. सूर्यकांत व न्या. उज्जल भुयान यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीमध्ये अजित पवार गटाने दोन आठवड्यांमध्ये न्यायालयात उत्तर सादर केल्यानंतर शरद पवार गटाने एक आठवड्यामध्ये प्रत्युत्तर देण्यास सांगण्यात आले आहे.सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला उत्तर सादर करण्यास सांगून चार महिने होऊन गेले तरी, त्यांच्याकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही. न्यायालयाने दिलेली मुदतही उलटून गेली आहे. हा मुद्दा शरद पवार गटाच्या वतीने खंडपीठासमोर मांडण्यात आल्याचे जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले. केंद्रीय निवडणूक आयोगाने लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार हे पक्षनाव व माणसाच्या हातातील तुतारी हे निवडणूक चिन्ह वापरण्याची परवानगी दिली आहे. शिवाय, या पक्षनावाने देणगी घेण्याचीही मुभा देण्यात आली आहे. मात्र, लोकसभा निवडणुकीत काही मतदारसंघांमध्ये अन्य उमेदवारांना तुतारी हे चिन्ह देण्यात आले होते. त्याविरोधातही शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या आक्षेपाची न्यायालयाने दखल घेतली आहे.





॥ झाडु संतांचे मार्ग ॥ करु पंढरीचा स्वर्ग ॥

**पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर**

स्वच्छ भारत अभियान | स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) | स्वच्छ सर्वेक्षण २०२४ व माझी वसुंधरा ३.०

**आषाढी यात्रा २०२४**

**यात्रेकरूंना व भाविकांना नम्र आवाहन**

पंढरपूर हे भुवैकुंठ नगरी आहे. या भुवैकुंठ नगरीमध्ये येणाऱ्या भाविक, भक्त यात्रेकरूंचे हार्दिक स्वागत आहे. या नगरीचे व चंद्रभागा नदीचे पावित्र्य व स्वच्छता राखणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य अबाधित राखणेकरीता खालील सुचनांचे सर्वांनी पालन करुन सहकार्य करावे ही नम्र विनंती.

१) यात्रेकरु, दिंडीकरी, फडकरी, भाविकभक्त इ. यांची राहणेची सोय भक्ती सागर ६५ एकर परिसर या जागेमध्ये केलेली आहे.
२) उघड्यावर शौचास बसु नये. प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेले तसेच आपल्या वास्तव्याच्या ठिकाणांच्या शौचालयांचा वापर करावा.
३) शौचालयात पुरेशा पाण्याचा वापर करावा.
४)**पत्रावळी व द्रोणचा वापर** :- जेवणाकरीता थर्माकोल, प्लास्टिकच्या पत्रावळी वापरू नये. त्याऐवजी पर्यावरणपूरक विघटन होणाऱ्या पत्रावळ्यांचा, द्रोणचा वापर करावा व प्लास्टिक कॅरीबॅगचा वापर टाळावा पर्यावरणाचा समतोल साधावा.
५)**कचरा व्यवस्थापन** :- आपल्या मठ/संस्था इ. मध्ये निर्माण होणारा कचरा/पत्रावळी द्रोण, शिळे खरकटे अन्न इ. तीन टिपामध्ये ओला, सुका व घातक असा वेगवेगळा साठवून ठेवावा. हे नगरपालिकेची घंटा गाडी आल्यावर त्यामध्ये द्यावा. रस्त्यावर व उघड्यावर कचरा टाकू नये.
६) नदीचे व बोअरचे पाणी पिऊ नये, नगरपरिषदेच्या नळाचे किंवा पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पाणी प्यावे.
७) शिळे अन्न, नासकी फळे व उघड्यावरील पदार्थ खाऊ नये.
८) धोकादायक इमारतींमध्ये राहू नये.
९)**पार्कीग व्यवस्था ठिकाणे** :- अंबाबाई पटांगण, संत गजानन महाराज मठामागे, इसबावी विसावा मंदिर समोर, सांगोला रोड एम.एस.ई.बी. समोर, कुंभार घाट समोर कवठेकर गल्ली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर मरिआई पटांगण, कराड रोड वेअर हाऊस जवळ, रेल्वे स्टेशन मैदान, अहिल्या देवी चौक नविन पुलाजवळ, वाखरी पालखी तळ, कुर्डवाडी रोड गणेश ढाबा पिछाडी इत्यादी ठिकाणी पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.
१०) रस्त्यावर अतिक्रमण करून रहदारीस अडथळा निर्माण करू नये.

**वरील सुचनांचे पालन करणे आपल्या व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने हितकारक आहे.**

सचिन इथापे
प्रशासक
नगरपरिषद पंढरपूर

डॉ.प्रशांत जाधव
मुख्याधिकारी
नगरपरिषद पंढरपूर

# संपादकीय

## राजकारणातील निर्णय..

अलीकडच्या काळात विविध गुन्ह्यांमुळे चर्चेचे केंद्र बनले आहे. कोयता गँगची दहशत आणि ड्रग्जने हे शहर पोखरले आहे की काय, असा प्रश्न निर्माण होतो. त्यातच मे महिन्यात कल्याणीनगर परिसरात झालेल्या एका घटनेमुळे हे शहर केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या पटलावर आले. १९ मे रोजी पहाटेच्या सुमारास पोर्शे या आलिशान गाडीने एका दुचाकीला धडक दिली. दुचाकीवरील अनिस अवधिया आणि अश्विनी कोस्टा या दोन्ही स्वारांचा मृत्यू झाला. वेदांत अग्रवाल हा अल्पवयीन पोर्शे गाडी चालवत होता आणि त्या गाडीवर नंबर प्लेटही नव्हती. मद्यपार्टी झाल्यानंतर एका पबमधून वेदांत बाहेर पडला आणि ताशी दोनशे किमीच्या स्पीडने गाडी चालवली आणि त्यामुळे हा अपघात झाला. अशा हिट अँड रनच्या घटना राज्यभरात कुठे ना कुठे तरी घडतच आहेत. पण वरळी येथील हिट अँड रनच्या घटनेने पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. वरळीत एका मद्यधुंद तरुणाने आपल्या बीएमडब्ल्यू गाडीने कोळी दाम्पत्याच्या दुचाकीला धडक दिली. त्यानंतर त्याने दुचाकीवरील महिलेला साधारणपणे शंभर मीटरपर्यंत फरफटत नेले. त्यात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर गाडीचा चालक मिहीर शहा फरार झाला. त्याला विरार येथून अटक करण्यात आली. त्याच्याबरोबर त्याच्या आई आणि बहिणीलाही ताब्यात घेण्यात आले. मिहीरला पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. श्रीमंत बापांच्या मुलांचा बेधुंदपणा वाढतच चालला आहे. असे प्रकार पाहता आता सामान्य माणसांना रस्त्यावरून चालण्याची भीती वाटत आहे. पुणे आणि वरळीतील घटनेत योगायोगाने म्हणा, पण काही साम्यस्थळे दिसतात. । दोन्ही घटनेतील आरोपी बड्या बापाची मुले आहेत. तसेच पुण्याप्रमाणेच वरळीच्या घटनेलाही राजकीय कंगोरा आहे. पुण्यात राष्ट्रवादीचे कनेक्शन समोर आले. वेदांत हा पुण्यातील प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल याचा मुलगा आहे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक बड्या नेत्याशी अग्रवाल कुटुंबाचे चांगले संबंध असल्याचे समोर आले. वरळीच्या हिट अँड रन प्रकरणातील आरोपी मिहीर हा ुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा उपनेता राजेश शहा याचा मुलगा आहे. शिवसेनेने त्याला पदमुक्त केले असले तरी, हा निर्णय तातडीने घेण्यात आला नाही तर, वरळीच्या घटनेनंतर चार दिवसांनी हा निर्णय घेण्यात आला, हे विशेष.

पान १ वरुन

## 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या..

हा उपक्रम गेल्या १४ वर्षापासून राबविण्यात येत असून याला एक आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. या विभागाने आषाढी वारी पुरतेच मर्यादित न राहता राज्यातील गावा गावात पर्यावरणा विषयी नागरिकांमध्ये जनजागृतीची मोहिम राबवावी. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने निधीची चिंता करू नये, पर्यावरण संवर्धन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

जगद्गुरु संत तुकाराम यांच्या 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे' या अभंगाप्रमाणे आपल्याला हरित महाराष्ट्र करावयाचा आहे. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने वृक्ष लागवड करून वातावरणातील उद्याचा धोका टाळावयास मदत करणे आवश्यक आहे. जागा मिळेल तिथे वृक्ष लागवड करावी. एक झाड आईच्या नावाने लावून त्याचे संवर्धन करावे. असे केल्यानेच अतिवृष्टी, प्रदूषण, अवेळी पडणारा पाऊस यावर मात करणे शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.सर्व शेती पंप सौर उर्जेवर रूपांतरित करण्याचे काम हाती घेतले आहे. शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा, मागेल त्याला शेततळे, वारकऱ्यांसाठी महामंडळाची स्थापना, दिंडीला २० हजार रुपये अनुदान देत आहोत. सर्व धर्मियांसाठी तीर्थ यात्रा योजना अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत. संत ज्ञानेश्र्वर यांचे जन्म ठिकाण नेवासा येथे विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. शेतीत चांगले काम झाल्याने या वर्षी राज्याला कृषी पुरस्कार प्राप्त झाला आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केले.

राज्यात २० लाख हेक्टर बांबू लागवड करण्याचे धोरण आहे. त्यासाठी हेक्टरी सात लाख रुपये अनुदान देत आहोत. बांबू मुळे २० टक्के ऑक्सिजन अधिक मिळतो. सौर ऊर्जा वापर करण्यासाठी धोरण आखलेले आहे. प्रत्येक महापालिकेस एक लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट दिले आहे. पंतप्रधानांनी देखील आईच्या नावे एक झाड लावण्यास सांगितले आहे. पर्यावरण समतोल सावरण्यासाठी वृक्षारोपण करण्याची गरज आहे. त्यासाठी झाडे लावण्याची गरज आहे. हरित महाराष्ट्र करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे, असे आवाहनही श्री शिंदे यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे, महसूल मंत्री श्री. विखे पाटील, आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी भजनाचा टाळ वाजवत ठेका धरत ज्ञानोबा तुकाराम, जय जय राम कृष्ण हरी असा गजर करत वारकरी भक्तांसोबत दंग झालेले पाहायला मिळाले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्या महासंस्कृती स्मरणीकेचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाराष्ट्र कला संस्कृती मंचचे ह.भ.प. ज्ञानेश्र्वर महाराज वाबळे, श्रीमती चंदाबाई तिवाडी, शाहीर देवानंद माळी, श्रीमती लता शिंदे यांच्यासह अन्य कलाकारांनी किर्तन, भारुड, पोवाडा यांच्या माध्यमातून टाळ मृदुंगात हरिनामाचा गजर करत पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जनजागृती कार्यक्रम सादर केले.

## पंढरपुरात विठू नामाचा गजर ..

भजन, हरिनामाच्या गजराने अवघी पंढरपूर नगरी दुमदुमून निघाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नी लता यांनी मोठ्या उत्साहात विठ्ठल रक्मिणीची शासकीय महापूजा केली. यावेळी त्यांनी बळीराजाला, कष्टकऱ्याला चांगले दिवस येऊ दे, आपलं राज्य सुजलाम सुफलाम होऊ दे, चांगला पाऊस पडू दे, राज्यातील प्रत्येक माणसाला चांगले दिवस येऊ देत असं विठुरायाचरणी साकडं घातलं.

पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी प्रत्यक्ष चक्रपाणी उभा असे या अभंगाप्रमाणे लाखो भाविक पंढरीला आषाढी सोहळ्यासाठी दाखल झाले आहेत. एसटी, रेल्वे आणि खासगी वाहनांमधून भाविक मोठ्या संख्यने पंढरपुरात दाखल झाले आहेत. त्याचबरोबर संतांच्या पालख्या देखील मोठ्या संख्येने पंढरपुरात पोहोचल्या आहेत. आषाढ दशमी म्हणजे मंगळवारी (१७ जुलै) पंढरी नगरीत जवळपास १२ लाखांहून अधिक भाविक दाखल झाले होते. आज ही संख्या दुप्पट झाली आहे. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागा भाविकांनी भरली आहे.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 'कृषी पंढरी महोत्सव–२०२४' या प्रदर्शनाचे उद्घाटन

**✻ कृषी प्रदर्शने हे शेतकऱ्यांना या क्षेत्रातील नवतंत्रज्ञानाची माहिती मिळण्यासाठी उपयुक्त ठरतात : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

**✻ राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमुळे सर्व सामान्य व्यक्तीच्या जीवनात परिवर्तन**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : कृषी प्रदर्शनामधून शेतकऱ्यांना कृषी क्षेत्रात आलेल्या नवनवीन तंत्रज्ञान तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यास मदत होते हे नवीन तंत्रज्ञान आपल्या शेतात वापरून त्यातून भरघोस उत्पादन शेतकरी घेतात व त्यांची आर्थिक उन्नती घडून येते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी अशी नवतंत्रज्ञानाची माहिती देणारी कृषी प्रदर्शने उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. कृषी उत्पन्न बाजार समिती व पांडुरंग प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात आयोजित 'कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कृषी महामहोत्सव–कृषी पंढरी २०२४'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा अध्यक्ष कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीष गायकवाड, उपसभापती राजुबापु गावडे आदी उपस्थित होते.



**शेतकरी वर्गाच्या कल्याणाकरीता शासन प्रयत्नशील**

शेतकरी आपला मायबाप, अन्नदाता, लाखांचा पोशिंदा आहे, शेतकऱ्यांचे दु:ख व वेदना जाणून घेण्याबरोबरच त्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शासनामार्फत विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामध्ये अतिवृष्टी, अवकाळी, गारपीट या नुकसानीच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करुन राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने मदत, या अंतर्गत मागील दोन वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीपोटी १५ हजार कोटी रूपयांची मदत देण्यात आली. मागेल त्याला सौरउर्जा पंप– शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जीकरण, 'एक रुपयात पीक विमा योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत १२ हजार रुपये देण्याचा निर्णय, शेतकऱ्यांना वीज देयकात माफी, ठिंबक सिंचन, दुधाच्या अनुदानात पाच रुपयांची वाढ, बांबु लागवडीकरीता हेक्टरी ७ लाख रुपयांचे अनुदान, बेदाणाचा शालेय पोषण आहारात समावेश, दिवसा वीज देण्याचा निर्णय असे विविध लोककल्याणकारी योजनेच्यामाध्यातून सुमारे ४४ हजार कोटी रुपयांची शेतकऱ्याला मदत करण्यात येत आहे. केंद्रशासनाच्या निगडीत प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी राज्य व केंद्र शासन मिळून काम करत आहे. या वर्षीचा महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मिळाला आहे.

✻शासकीय योजनांच्या लाभापासून एकही लाभार्थी वंचित राहू नये : समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने घेण्यात आलेले विविध निर्णय, योजनांमुळे त्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे काम होते, त्यामुळे सर्व सामान्यापर्यंत या योजना पोहचविण्याचे काम प्रशासनाने अचूकपणे करावे; समाजातील सर्व घटकाला याचा लाभ देण्याबरोबरच एकही पात्र व्यक्ती या योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याबाबत प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

**महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, स्वावलंबनाला चालना**

राज्याच्या विकासाकरीता समाजातील सर्व घटकांसाठी विविध योजनांचा समावेश करुन त्यांना लाभ देण्यात येत आहे. हे सरकार शेतकऱ्याचे, वारकऱ्यांचे कामगारांचे, कष्टकऱ्यांचे आणि सर्व सामान्यांचे आहे. राज्यशासनाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजने'अंतर्गत महिलांना १ हजार ५०० याप्रमाणे वर्षाला १८ हजार रुपयांचा लाभ देण्यात येणार असून या योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात लवकरच रक्कम जमा करण्यात येणार आहे. अन्नपूर्णा योजनेंतर्गत वर्षाला तीन मोफत गॅस सिलिंडर देण्यात येणार आहे. शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित, अशासकीय महाविद्यालये अशा शैक्षणिक संस्थेत विद्यार्थिनींना शैक्षणिक व परीक्षा शुल्क १०० टक्के माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**युवकाच्या हाताला रोजगार देण्याचे काम सुरु**

युवा अप्रेंटिसशीप योजनेतंर्गत १२ वी उत्तीर्ण, पदविकाधारक आणि पदवीधर विद्यार्थ्यांना अनुक्रमे ६ हजार, ८ हजार आणि १० हजार दरमहा विद्यावेतन देण्यात येणार आहे. तरुणांना रोजगार तसेच उद्योजकाला कुशल मनुष्यबळ मिळण्यास मदत होणार आहे, असे श्री. शिंदे म्हणाले. यावेळी माजी आमदार श्री. परिचारक यांनी आपले मनोगत व्यकत केले. प्रारंभी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी फित कापून प्रदेशाचे उद्धाटन केले. त्यानंतर प्रदर्शनातील विविध दालनांना भेटी देवून पाहणी करून समाधान व्यक्त केले.

या प्रदर्शनात एकूण २०० स्टॉल्स उभारण्यात आले असून त्यापैकी शासकीय विभागाचे ५०, महिला बचत गटचे १५ स्टॉल आहेत. इतर महामंडळ, शेतकरी उत्पादक कंपनी, मिलेट उत्पादने, प्रक्रियायुक्त पदार्थ, सेंद्रीय व औषधी पदार्थ, बियाणे खते औषधे कंपनी, ठिबक व तुषार सिंचन उत्पादक,कृषी यांत्रिकीकरण आणि गृहोपयोगी वस्तुंचे स्टॉल्स आहेत. कृषी पंढरी या प्रदशनाला हजारो शेतकरी, वारकरी व नागरिकांनी भेटी दिल्या.

# अन्न व औषध प्रशासन, सोलापूर कार्यालयामार्फत धडक कारवाई ३००० बाटली बंद पाण्याच्या बाटल्या केल्या जप्त

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधी: दिनांक १५/०७/२०२४ रोजी अन्न व औषध प्रशासन, सोलापूर या कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी श्री डॉ. उमेश भुसे यांना आषाढी यात्राच्या अनुषंगाने तपासणी करीत असताना स्मार्ट कंपनीच्या बाटली बंद पाणी बॉटल वर लेबलदोष असल्याचे आढळून आले. त्यानंतर श्री भुसे हे तात्काळ सदर पाणी बॉटलवर नमूद मे. पृथ्वीराज एंटरप्राइज, मु. पोस्ट. लक्ष्मी दहिवडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर या कंपनीस भेट दिली. तपासणी वेळी सदर पेढी ही विनापरवाना बाटलीबंद पाण्याचे व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले . त्यानंतर श्री उमेश भुसे



यांनी स्मार्ट पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर या अन्न पदार्थांचा नमुना विश्र्लेषणासाठी घेऊन उर्वरित ३००० बॉटल्स ( २५० बॉक्स) विनापरवाना व्यवसाय, लेबलदोष च्या अनुषंगाने जप्त केला. तसेच सदर पेढीस अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांतर्गत परवाना मंजूर होई पर्यंत व्यवसाय बंद चे आदेश दिलेले आहे. तसेच सदर पाणी बॉटल चा नमुना विश्र्लेषणासाठी अन्न विश्र्लेकांकडे यांच्याकडे पाठविण्याचे कामकाज चालु आहे. सदरची कारवाई पुणे विभागाचे सह आयुक्त श्री सुरेश अन्नपुरे तसेच सोलापूर कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) श्री. सुनिल जिंतुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी श्री. डॉ उमेश भुसे व नमुना सहाय्यक श्रीशैल हिटनळ्ळी यांच्या पथकाने पुर्ण केली.

# शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'संवाद वारी' हा उपक्रम महत्त्वाचा : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने शासकीय योजनांच्या प्रचार प्रसिद्धीसाठी 'संवाद वारी' हा उपक्रम राबवला जात आहे. या माध्यमातून राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम असलेला 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेचीही प्रचार प्रसिद्धी चांगल्या प्रकारे होत आहे. शासनाच्या विविध योजना तळागाळातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'संवाद वारी' सारखे उपक्रम महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर पंढरपूर येथे आयोजित 'संवाद वारी' या शासकीय योजनेच्या प्रदर्शन स्टॉलला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देऊन योजनांची प्रसिद्धी कशा पद्धतीने केली जात आहे याची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, पुणे विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. पुरुषोत्तम पाटोदकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आषाढी वारीच्या पार्श्र्वभूमीवर संवाद वारी हा उपक्रम पुणे येथून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराज पालखी व जगदुरु श्री तुकाराम महाराज पालखी यांच्या समवेत शासकीय योजनांची प्रसिद्धी करत इथपर्यंत आलेला आहे. त्यामुळे या पालख्या समवेतच्या प्रवासातील विसावा व मुक्कामाच्या ठिकाणी व पालखी मार्गात येणाऱ्या विविध गावातील नागरिकांपर्यंत शासकीय योजना पोहोचवण्यास मदत झालेली आहे. 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना' ही अशा प्रसिद्धीमुळेच तळागाळापर्यंत पोहोचत आहे. माहिती विभागाचे प्रचार प्रसिद्धीचे कामही चांगले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माहिती उपसंचालक श्री पाटोदकर यांनी माहिती विभागाच्या संवादवारी या उपक्रमाची सविस्तर माहिती मुख्यमंत्र्यांना दिली तसेच या प्रदर्शन स्टॉलमध्ये लावण्यात आलेल्या विविध योजनांविषयी माहिती दिली.प्रारंभी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी संवाद वारी उपक्रमातील विविध योजनांची पाहणी केली व 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण' योजना सर्वदूर पोहोचवून एकही पात्र बहीण या योजनेपासून वंचित राहणार नाही याबाबत योग्य नियोजन करावे, असेही त्यांनी सूचित केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# ऐन पावसाळ्यात अक्कलकोटवासीयांना पाणी टंचाईचे संकट



**सुन म्हणे सासूला, पाणी नाही नळाला, सासू म्हणे सुनेला, मत दे रिपाईला, पाणी येईल नळाला....र**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः राज्यामध्ये सध्या मान्सून मोठ्या प्रमाणात बरसत असून काही जिल्हा तसेच तालुक्यामध्ये पुरस्थीती निर्माण झाली असून सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुका व शहरामध्ये म्हणावे तितके पाऊस न पडल्यामुळे नागरीकांना भिडणाऱ्या मुलभूत तिन गरजापैंकी एक महत्वाचे म्हणजे पाणी हे जिवनाचे अंतीम सत्य आहे. पण सध्या ऐन पावसाळयात अक्कलकोटवासीयांना आठ ते दहा दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. तरी अक्कलकोट नगरपरिषदेकडून त्यावरती कोणत्याही प्रकारची उपाययोजना होत नसल्याची दिसुन येत नसल्याने जनतेमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. अक्कलकोट शहरातील वेताळ चौक, मोरे वस्ती, माणिक पेठ, भिमनगर या वस्तीमध्ये प्रत्येकी दोन लाख लिटर पाण्याची टाकी बांधले असून त्यातील भिमनगर येथील पाण्याची टाकीचे टेस्टींग करण्यात आली. त्या आशेने त्यानंतर अनेक लाभार्थी टेस्टींग झाल्यानंतर प्रत्येक कुटुंबीय नगरपालिकेला शासनाच्या नियमानुसार हमीपत्र, बॉन्ड पेपर, घरपट्टी, तसेच सारा कर इत्यादी सर्व काही भरुन देखील भिमनगर मधील नागरीकांना नळ कनेक्शन अधीकृत घेतले असताना त्यांना कळाले की सदर पिण्याच्या पाण्याची टाकिचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने गळती होत असल्याचे निदर्शनास असल्याने आजतागायत भिमनगर वासीय पिण्याच्या पाण्याची प्रतिक्षा करीत आहेत. तरी आजतागायत नगररीषेकडून आजपर्यंत पिण्याचे पाणी येथील नागरीकांना मिळाले नाही. नगरपरिषद फक्त वसुली करण्यामध्ये व्यस्त आहे माञ तेथील नागरिकांना सुख सुविधा देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत. तिर्थक्षेञ असलेल्या पवित्र ठिकाणी जर नागरिकांना अशी वागणूक भेटत असेल तर राज्यातील इतर नागरीकांचे विचार न केलेले बरे. स्वामी समर्थ समाधी मंदिर ते स्वामी समर्थ समाधी मठापर्यंत स्वामी भक्तांना कोणत्याही प्रकारची पिण्याच्या पाण्याची अथवा शौचालयाची व्यवस्था नगरपालिकेच्या वतीने करण्यात आली नसल्याने अनेक महिलांनी याबाबत नगरपरिषद प्रशासनाचे निषेध व्यक्त केले आहे. अक्कलकोट शहरात नळपट्टी भरुन देखील वेळेवरती पाणी पुरवठा होत नसल्यामुळे उन्हाळ्यात २०-२२ दिवसाआड पाणीपुरवठा आणी पावसाळयात १०-१२ दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. याची सरासरी पकडली असता महिन्याला दहा दिवस पाणी पुरवठा नगरपरिषदेकडून होत असून वार्षिक पाणी पुरवठा काढले असता वर्षातून फक्त १२० दिवस पाणी पुरवठा नगरपरिषदेकडून होत आहे माञ त्याबदल्यात पुर्ण वर्षाचे म्हणजेच ३६५ दिवसाचे पाणी पुरवठा कर सर्व सामान्य नागरीकांकडून वसूल करण्यात येत आहे. तसेच दहा दिवसातूनही नळपट्टी तसेच घरपट्टी भरुन देखील काही भागामध्ये पाणी पुरवठा होत नसल्याने खाजगी पाणी टँकर मागवून एका हजार पाणी टँकर मागे ३०० रुपये मोजावे लागत आहे. याठिकाणी नगरपरिषदेकडून कोणत्याही प्रकारची उपाययोजना होत नसल्याची दिसुन येत नसल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांच्या कडे भिमनगर येथील तसेच अक्कलकोट शहरातील अनेक नागरिक या विषयावरची आवाज उठविण्यासाठी विनंती करीत आहेत.जर येत्या आठवडाभरात त्यावरती कोणत्याही प्रकारची उपाययोजना होत नसल्याचे दिसून असल्यास गुरुपौर्णिमा उत्सव झाल्यानंतर अक्कलकोट नगरपरिषदेसमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी दिले आहे.

# जीवनसंघर्षकार साहित्यिक नवनाथ रणखांबे आयकॉन ऑफ नेशन राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

## रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्डचा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

ठाणे/मिलिंद जाधव :महाराष्ट्रातील सांस्कृतिक पुणे नगरीत विशाल समारोहाच्या अनुषंगाने जम्मू राज्याच्या राणी डॉ. सुहासिनी सुदन आणि पद्मश्री पुरस्कार विजेता डॉ. विजयकुमार शहा , यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय विविध बुक ऑफ रेकॉर्ड धारक आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय विविध पुरस्काराने सन्मानित, प्रसिद्ध कवी, जीवनसंघर्षकार फेम नवनाथ आनंदा रणखांबे यांना आयकॉन ऑफ नेशन या मानाच्या राष्ट्रीय पुरस्काराने नुकतेच पुणे -पिपरी येथील आचार्य आत्रे रंगमंच येथे सन्मानित करण्यात आले. नवनाथ रणखांबे हे सध्या कल्याण (ठाणे) येथे वास्तव्यास आहेत. मराठी साहित्य विश्र्वात त्यांचे महत्त्वाचे योगदान असून त्यांचे जीवन संघर्ष आणि प्रेम उठाव हे दोन ग्रंथ गाजत आहेत. कला साहित्य , शिक्षण , कामगार संघटन, न्यायविभाग, सामाजिक उपक्रम आदी विविध क्षेत्रात त्यांचे कार्य सुरू आहे. ते आपल्या लिखाणातून आणि कविता, व्याख्याने या द्वारे जनमानसात महाराष्ट्र भर समाज प्रबोधन करीत आहेत. भारत देशातील विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उमटविणाऱ्या प्रतिभाशाली कार्यवीरांना सतरावे अखिल भारतीय प्रतिभा प्रेरणा महासंमेलना च्या पार्श्र्वभूमीवर आयकॉन ऑफ नेशन या राष्ट्रीय पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले . तसेच अंगभूत अद्भुत बुद्धिमत्ता व प्रतिभा धारण करून विविध क्षेत्रात गुणवत्ता व प्राविण्य सिद्ध केल्याबद्दल निवडपात्र पुरस्कारार्थी यांना रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स ( आरटीबीआर ) मध्ये समाविष्ठ करीत आंतरराष्ट्रीय कीर्तिमान प्रमाणपत्र , स्मृतीचिन्ह , गोल्ड-मेडल आणि मेम्बरशिप बहाल करून गौरविण्यात आले. उन्नत व विकसित भारताचा पाया रचणाऱ्या व आपल्या मूल्याधिष्ठित कलोपासक कर्तृत्वाने आणि समर्पित साधनेतून स्वतःचे वेगळेपण सिद्ध करीत देशाचे नाव जागतिक मंचावर गौरविणाऱ्या भारत देशातील गुणवंत व




प्रतिभावंत व्यक्तींना पुरस्कृत कारण्याचे अद्भुत कार्य रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्डने केले आहे.यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. कौशिक गायकवाड, रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्सचे संस्थापक - मुख्य संपादक डॉ. क्रांती महाजन , राजमाता जिजाऊ यांच्या घराण्याचे वंशज शिवाजी राजे जाधव , तंजावर घराण्याचे वंशज विजयसिंह राजे भोसले , भारत सरकारच्या ऋ-२० चे डायरेक्टर तथा रूडकी आयआयटी चे रजिस्ट्रार संजीव जैन्थ , भारत सरकारच्या एनवायकेएस चे मेघालय मणिपूर नागालँड चे संचालक अतुल निकम , गोवा व महाराष्ट्र राज्याचे संचालक यशवंत मानखेडकर , कॅनडाचे निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ. गुरतेज सिंग ब्रार , सीआयडी ऑफिसर आरिफा मुल्ला , समाजसेवक यशवंत कुर्वे , चीफ एडज्यूकेटर ज्युरी डॉ. एस. देवेंद्र, स्वागताध्यक्ष संतोष बारणे, आदी मान्यवर उपस्थित होते. जागतिक मंचावर आयोजन करणारी क्रियाशील रेडियंट टॅलेंट बुक ऑफ रेकॉर्ड्स ( आरटीबीआर ) द्वारे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिभा , गुणवत्ता , सेवाभाव , कर्तृत्व आणि बुद्धिमत्तेमुळे असामान्य कार्य करणाऱ्या मुलांना , महिला - पुरुष व्यक्ती आणि संस्थांना कार्यप्रवण करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन देवून पुरस्कृत करण्याची दैदिप्यमान परंपरा असून जे कार्य उत्तम , उदात्त व उन्नत आहे , त्याची दखल घेवून त्याची ऐतिहासिक नोंद करून त्यांना गौरवान्वित करण्यात येते.

# श्री सद्गुरू कानिफनाथ विद्यालयात पालखी सोहळ्यातून फुलला विठ्ठल भक्तीचा मळा.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुरंदर : बोपगाव तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथील श्री सद्गुरु कानिफनाथ माध्यमिक विद्यालयाने पर्यावरणाचे संवर्धन व महाराष्ट्राच्या अध्यात्मिक वैभवाचे संस्कार दिंडी मधून दर्शवले रांगोळी फुलांनी सजवलेली पालखी, विठ्ठल रुक्मिणी, तुळशी वृंदावन, डोक्यावर घेतलेले वारकरी विद्यार्थी विद्यार्थिनी गळयात टाळ, कपाळा ला अष्टगंध आणि टोपी अशी वेशभूषा करून ज्ञानोबा -माऊली तुकाराम चा जयघोष करत विठ्ठल भक्ती त तल्लीन झालेले इयत्ता आठवी ते दहावी तील विद्यार्थी विद्यार्थिनी.




विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातून काढलेली वृक्षदिंडी पर्यावरणाचे संदेश लक्षवेधी ठरले.

१)पर्यावरण जगवा,व सुंधर वाचवा. २)वृक्षाचे करा संवर्धन,धरतीचे होईल नंदनवन. ३)वृक्ष लावा दारोदारी,समृद्धी होईल घरोघरी. ४)करा ल झाडावर माया,तर मिळेल दाट छाया. ५)झाडांना द्या सा थ,प्रदूषणावर करीतील मात. ६)झाडें लावा झाडे जगवा. ७)जेथे झाडे उदंड, तेथे पाऊस प्रचंड. पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या ज्ञानेश्र्वर महाराज,तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळयाची अनुभूती विद्यार्थ्यांना यावी यासाठी श्री सद्गुरु कानिफनाथ माध्यमिक विद्यालयाने पालखी सोहळा पर्यावरणाचे संदेश याचे आयोजन केले होते पालखी सोहळयासाठी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्राम प्रदक्षिणा घालून दिंडीचे नियोजन केले.

विठ्ठल रुक्मिणी,वारकरी, विणेकरी त्यांची वेशभूषा करून टाळ मृदुंगाच्या गजरात पालखी सोहळा उत्साहात पार पडला,विद्यार्थ्यांच्या पालखी मिरवणुकी त ग्रामस्थांनी सहभाग घेतला.त्यामध्ये तबलावादक बाळू तात्या फडतरे, तुकाराम यादव फडतरे,रामभाऊ बाळासो फडतरे यासह पालखी सोहळ्याचे नियोजन करणारे श्री सद्गुरु कानिफनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री मारुती झगडे सर त्यांचे सहकारी श्री बनकर सर,श्री काकडे सर,श्री नेवसे सर,सौ शमिका गारडे मॅडम, सौ शितोळे मॅडम, या सर्व मिळून या पालखी सोहळ्याचे सुंदर असे नियोजन केले.

# पुजाऱ्याला फाशीची शिक्षा द्या

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः वंचित बहुजन आघाडी सोलापूर जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील बेलापूर येथील सुसंस्कृत महिला अक्षता मैत्री ही घरगुती तक्रारीवरून एका




मंदिरामध्ये मन शांतीसाठी जाऊन बसले असता तेथील मंदिराचा पुजारी आणि त्याच्या साथीदाराने तिला चहा मध्ये गुंगीचे औषध देऊन बेशुद्ध अवस्थेत पाशवी बलात्कार करण्यात आला एवढ्यावर त्यांचा क्रुर पणाचा कळस अत्यंत क्रूरपणे गळा दाबून दगडाने ठेचून तिची हत्या करण्यात आली. असल्या नराधमांना तात्काळ फास्टट्रॅक कोर्टात खेचून या हरामी आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी त्याचप्रमाणे सांगोला तालुक्यात महूद या ठिकाणी सुनील कांबळे या मातंग समाजाच्या युवकाला किरकोळ कारणावरून त्याची हत्या करण्यात आली याही आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशा प्रकारची मागणी करिता वंचित बहुजन आघाडी शहर व जिल्ह्याच्या वतीने निवासी तथा अप्पर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, जिल्हा महासचिव अनिरुद्ध वाघमारे, जिल्हा संघटक गौतम बनसोडे, जालिंदर चंदनशिवे, लोकसभेचे उमेदवार आतिश बनसोडे, ओबीसी चे नेते उमेश काळे, शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, शहर महासचिव विनोद इंगळे, महिला शहराध्यक्ष पल्लवी ताई,सुरवसे , माजी जिल्हाध्यक्ष नाना कदम आप्पा बनसोडे माजी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड विक्रांत गायकवाड सचिन दादा गायकवाड वकील साहेब पोलीस टाईम्स चे प्रतिनिधी कुलकर्णी साहेब दत्ता साहेब सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ते रवीराज पोटे अक्कलकोट शहराध्यक्ष विशाल ठोंबरे, दक्षिण सोलापूरचे तालुकाध्यक्ष शंकर शिंदे ,सुरेश देशमुख, अभी गायकवाड अधिक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते

# आळगे येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी ,उर्दू कन्नड शाळेत आषाढ एकादशी निमित्ताने ग्रंथ दिंडी,वृक्ष दिंडी व आषाढ वारी दिंडीची कार्यक्रम

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

आळगे/प्रतिनिधीः दिंडीत विठ्ठल रुक्मिणी यांचे प्रतिमेचे पूजन गावचे ज्येष्ठ नेते श्री महादेव सत्यप्पा पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गड्डेप्पा कोरे , उपाध्यक्ष श्री संतोष चराटे,श्रीशैल माळगे ,मलकणा पाटील, औदुसिद्ध पुजारी, सिद्राम पाटील , संगमेश बिराजदार, सरपंच श्री महातेंश हत्तुरे, उपसरपंच रियाज मुल्ला, या मान्यवरांचे हस्ते पुजा करण्यात आले.



विठ्ठलाच्या वेशात कुमार शुभम संगमेश बिराजदार व रुक्मिणीच्या वेशात स्नेहा मलिकार्जुन स्वामी, वृक्ष दिंडी सौंदर्या संतोष चराटे ,मुक्ताईच्या वेशात प्रतीक्षा गड्डेप्पा कोरे यांच्या समवेत गावात दिंडी काढण्यात आली. वाजत गाजत दिंडी विठ्ठलाच्या गजरात ,तल्लीन झालेली विद्यार्थी , शिक्षक, गावकरी, घरा घरात दारापर्यंत विठ्ठल सक्मिणी ची दर्शन झाले असे गावातील लोकांना झाले.

त्यांनंतर ग्रामपंचायत कार्यालय आणि हनुमान मंदिर समोर रिगण सोहळा आयोजित करण्यात आले.अनेक मुला मुलींनी फुगडी खेळून आपले आनंद व्यक्त केले. रिंगणामध्ये पैसे ठेवून पळण्याची स्पर्धा सुध्दा घेण्यात आले.अतिशय उत्कृष्ट पद्धतीने आनंदाने रिंगण सोहळा पार पाडला. या आषाढी दिंडीमध्ये अंगणवाडी सेविका सौ कुलकर्णी मॅडम, स्वामी मॅडम, माळगे मॅडम, काशिनाथ हत्तुरे, सिद्धाराम टाकळे, गौडप्पा अंबलगी , अँड पैंगबर सय्यद शेख, चिकिरेप्पा माळगे हिम्मत कुमठे, श्रीशैल विजापूरे, मलिकार्जुन टाकळे, पिंटु पुजारी, सिद्धाराम गु माळगे, वहिदबाश कुमठे, सुरेश कोळी, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री अखलाख शेख सर, मिळकुंदे सर, गुरुनाथ बिराजदार सर,श्र गिरीश कोरे सर, शिवशंकर हणमशेट्टी सर, सकलेश्र्वर पुजारी सर, निंगणा कोळी सर, शिवानंद कोळी सर, सुरज उईके सर, हणमंत पाटील सर, हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी यांचे सहकार्य लाभले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समस्थ ग्रामस्थ मंडळ आळगे यांच्या सहकार्य लाभले. तसेच आजच्या शालेय पोषण आहारात शिरा व मसाला भात असा मेनू होता.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निष्ठावातांचा पंढरीत येणाऱ्या भाविकांसाठी मोफत अन्नदान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःआषाढी वारी निमित्त पंढरपुरात येणाऱ्या सर्व भाविकांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मोफत अन्नदान उपक्रम शिवसेना ठाणे विभाग यांच्या वतीने पंढरपूर येथील नवीन बस स्थानक मनमाडकर मठ परिसरातील ठिकाणी करण्यात आले आहे.यासाठी नवीन बस स्थानक व मनमाडकर मठ परिसरातील उभारण्यात आला आहे



याची पाणी ठाणे महानगरपालिकेची स्थायी समिती सभापती राम रेपाळ व शिवसेना सोलापूर जिल्हा लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठी आधी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली यावेळी बोलताना राम रेपाळ म्हणाले की राज्याचे आराध्य दैवत श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपुरात दाखल होतात व येणाऱ्या भाविकांसाठी विविध सोयी सुविधा उपलब्ध करून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी उपलब्ध करून दिले आहेत गतवर्षीप्रमाणे याही वर्षी मोफत अन्नदान ठेवण्यात आले असल्याचे सांगितले यावेळी बोलताना महेश साठी म्हणाले की मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी राज्यातील सर्व नागरिकांसाठी विविध योजना राबवण्याचे काम केले आहे यामध्ये लेख लाडकी योजना मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण या योजना शेतकऱ्यांसाठी विविध योजना यंदा प्रथमच पालखीतील दिंड्यांना वीस हजार रुपये अनुदान देण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे यामुळे राज्यातील जनतेमध्ये पुढील काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच राहावे अशी भावना असल्याचा विश्र्वास व्यक्त केला जात आहे. यावेळी त्यांच्यासोबत ठाणे येथील जयप्रकाश कोतवाणी रोहित गायकवाड मुंबई मुलानी प्रियंका परांडे प्रेमीला कुरांडे तानाजी वसेकर पांडुरंग शिंदे सतीश पाटील सुरेश पवार सचिन शिंदे बाळू भोसले सिद्धेश्र्वर शिंदे किसान काळे वैशाली काळे विजय चव्हाण अमोल भोसले शिवते चव्हाण आंबेडकर जनार्दन काळे इत्यादी उपस्थित होते

# पुण्यातील गुरु रविदास मंदिर तिसरे धर्मस्थान येथे गुरुपौर्णिमा उत्सवाचे आयोजन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे/प्रतिनिधी : संत शिरोमणी श्री रविदास महाराज गुरुपौर्णिमा उत्सव आयोजित करण्यात आले आहे.श्री १०८ संत निरंजदासजी महाराज प.पु.धर्मगुरुअखिल भारतीय रविदासिया धर्म संकठन चेअरमन यांच्या शुभ आशिर्वाद व मा.श्री.सुखदेव महाराज राष्ट्रीय अध्यक्ष अ.भा.रविदासिया संगठन व संस्थापक तिसरे धर्मस्थान यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुपौर्णिमा उत्सव सकाळी १० ते १२ अमृतवाणी पाठ, सत्संग, प्रवचन आरती १२ नंतर महाप्रसाद व्यवस्था करण्यात आली आहे.तरी सर्व गुरूप्रेमी समाज बांधवांनी कार्यक्रमाला उपस्थित शोभा वाढवावी असे आवाहन गुरू रविदास महाराज मंदिर तिसरे धर्मस्थान सेवादार कमिटी यांनी कळविले आहे

दैनिक
यश सिद्धि न्यूज

बुधवार दि.१७ जुलै २०२४


# भक्ती, शक्ती, धर्म-संस्कार प्रबोधन या त्रिवेणी संगमात लाख भक्तजनांना आनंदाचे डोही आनंद तरंग

## सडेतोड व परखड विचार राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर यांची कार्यक्रम संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः सध्याच्या विविध घडामोडीवर वृत्ती, वल्ली व कृती बाबत सडेतोड व परखड विचार राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर यांनी व्यक्त केले. त्यांच्या कीर्तन कार्यक्रमास भन्नाट श्रोत्यांच्या गर्दीने संपूर्ण परिसर व्यापुन गेलेला होता. भक्ती, शक्ती, धर्म-संस्कार प्रबोधन या त्रिवेणी संगमात लाख भक्तजनांना आनंदाचे डोही आनंद तरंग अशी अनभुती दिली. प्रचंड गर्दीमुळे न्यासाचा परिसरात ठिकठिकाणी स्क्रीनद्वारे प्रक्षेपण करण्यात आले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३७ वा. वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवनिमित्त धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक उत्सव म्हणजे स्वामी भक्तांना मिळणारी उर्जा आहे. या कार्यक्रमाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष असून, न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. मंगळवारी सायंकाळी ७ वाजता राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर



(संगमनेर, अकोलेकर) यांच्या 'किर्तन' कार्यक्रमाने ६ वे पुष्प संपन्न झाले. या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज, व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी राज्यमंत्री सिद्धराम म्हेत्रे, माजी जि.प.सभापती मल्लिकार्जुन पाटील, धाराशिवचे माजी जि.प.सभापती मुकुंद डोंगरे, माजी प.स.सदस्य धनेश अचलेरे बोरामणी, माजी उपनगराध्यक्ष अशपाक बळोरगी, निवृत्ती महाराजांचे स्वीय सहायक किरण साठे, आबा कापसे हे उपस्थित होते.

दरम्यान राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर यांचा सत्कार न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. या कीर्तनाला श्री स्वामी समर्थ वारकरी शिक्षण संस्था चीखुर्दा ता.जि.लातूरच्या वारकऱ्यांनी साथ दिली. यावेळी न्यासाचे विश्र्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, संगीता भोसले व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त भाऊ कापसे, विश्र्वस्त राजेंद्र लिंबीतोटे, संतोष भोसले, डॉ.मनोहर मोरे, प्रा.प्रकाश सुरवसे, अरविंद शिंदे, अँड.संतोष खोबरे, ओंकारेश्र्वर उटगे, राजाभाऊ निकम, मनोज निकम, स्वामीराव सुरवसे, प्रकाश पडवळकर, बाळासाहेब मोरे, सायबण्णा जाधव, वैभव नवले, विश्र्वनाथ देवरमनी, बसवराज धनशेट्टी, योगेश कटारे, प्रशांत बिराजदार, प्रा.शरणप्पा अचलेर, अप्पा हंचाटे, पिटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, महादेव अनगले व राजेंद्र पवार, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, प्रसन्न बिराजदार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी, गणेश पाटील, प्रीतीश किलजे, सिध्दाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिकार्जुन कोगाणुरे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्र्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले.

### सद्य स्थितीवर परखडपणे समाज प्रबोधन

**राष्ट्रीय किर्तनकार व धर्म प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्त महाराज यांनी संत तुकाराम, एकनाथ, निवृत्ती महाराज, ज्ञानदेव, मुक्ताबाई, सोपान व ज्ञान, देव, ध्यान, नम्रता, लक्ष्मी,मी पणा, संपत्ती, दया, संत देव, सुख समाधान याबाबत उदाहरणासह अभंगातील दाखला देत मन मुराद, उपस्थितांनी टाळ्यांचा गजरात सद्य स्थितीवर त्यांनी परखडपणे समाज प्रबोधन केले. श्रीक्षेत्र अक्कलकोट हे गुरु पीठ आहे. या गुरु पिठात अन्नछत्राच्या माध्यमातून सुरु असलेले महाप्रसादा बरोबरच विविध उपक्रमाचे कौतुक केले.**

**दि. १७ जुलै रोजी बुधवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत महाराष्ट्राचे हास्य जत्रा सादरकर्ते समीर चौगुले, ओंकार राऊत, ईशा डे, प्रसाद खांडेकर, चेतन भट, अरुण कदम, प्रभाकर मोरे, वनित खरात, नम्रता संभेराव, शाम राजपूत, पृथ्वीक प्रताप यांचा धमाल उडवणारा कार्यक्रम होणार आहे.**

# रोपळे विकास प्रतिष्ठानकडून भाविकांना अन्नदान






**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः अन्नदानाचे गाव म्हणून अवघ्या महाराष्ट्रामध्ये परिचित असणाऱ्या पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील रोपळे विकास प्रतिष्ठानच्या वतीने आषाढी वारीसाठी पंढरीकडे जाणाऱ्या भाविकांना अन्नदान करण्यात आले. रोपळे विकास प्रतिष्ठानचे मार्गदर्शक व कोल्हापूर जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाचे अध्यक्ष शिवाजीराव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिष्ठानकडून अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येत असून त्यामुळे समाजातील अनेक गरजूंना दिलासा मिळत आहे. याच उपक्रमांपैकी एक म्हणजे वारीतील भाविकांना करण्यात येणारे अन्नदान. या अन्नदानाचे यंदाचे पाचवे वर्ष असून यंदाही कुर्डूवाडी पंढरपूर मार्गावरून जाणाऱ्या भाविकांना मोठ्या भक्ती भावाने अन्नदान करण्यात आले.

यावेळी रोपळे विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन भोसले,उपसरपंच विलास अ भोसले,रोपळे विकास प्रतिष्ठानचे संचालक हर्षवर्धन शहा,बालाजी भोसले,प्रदिप भोसले ,प्रसन्न जाधव,दिपक भोसले, युवा सेनेचे महादेव भोसले,तेजेश भोसले, रणजित भोसले,सतीश भोसले,चंद्रकांत कदम, संजय रितोंड,सुधीर भोसले,पोपट पाटोळे, रणजित चव्हाण,लखन जाधव,प्रमोद हडपे, मधुकर जाधव,गणेश चंदनवाले,मनोज चंदनवाले,विशाल चंदनवाले,परशुराम चंदनवाले,निखिल गायकवाड, मयूर गायकवाड यांच्यासह प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### सामाजिक उपक्रमातून गरजूंना दिलासा दिल्याचे समाधान...

रोपळे विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून या माध्यमातून गरजवंतांना दिलासा दिल्याचे समाधान मिळते. समाजासाठी सेवेची आणि मदतीची भूमिका अनेक वेळा शाश्र्वत विकासाला चालना देणारी ठरते. तर भाविकांना अन्नदान करण्याचा उपक्रम भाविक सेवेचा सामाजिक विचार आहे. - शिवाजीराव भोसले,अधीक्षक, कोल्हापूर जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय

# आषाढी वारीत वारकऱ्यांची तहान भागवत आहेत स्वेरीचे विद्यार्थी

## राज्याचे माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते पाणी वाटप कार्याचे उदघाटन



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठलाच्या भेटीसाठी आतूर झालेल्या वारकऱ्यांची तहान दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वेरीचे विद्यार्थी भागवीत आहेत. राज्याचे माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते, पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य राजेश पांडे, मोहन डांगरे, स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत या उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या पाणी वाटपाच्या उपक्रमात श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित असलेल्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिग्री), कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा), डी.फार्मसी व बी.फार्मसी या चारही महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी असे मिळून जवळपास १०० जण सहभागी झाले आहेत.

राज्यात तंत्रशिक्षणातून विशेष ओळख निर्माण करणाऱ्या 'स्वेरी' या संस्थेमार्फत, संस्थेच्या स्थापनेपासून अर्थात १९९८ पासून विविध समाजोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आलेले आहेत. दिंडीतील वारकऱ्यांचा सहभाग पाहता यंदा वारीत वारकऱ्यांची गर्दी अधिक होण्याची चिन्हे दिसत आहेत. परंपरेप्रमाणे दर्शन रांगेतील वारकऱ्यांना आर.ओ. फिल्टर्ड पिण्याचे पाणी वाटपाचे कार्य काल सोमवार (दि.१५ जुलै) पासून सुरु झाले. वारकऱ्यांच्या उपस्थितीत रिद्धी सिद्धी गणपती मंदिरालगत असणाऱ्या पत्राशेड मधील दर्शन मंडप रांगेतील वारकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी देवून या पाणी वाटपाच्या उपक्रमाचे उदघाटन करण्यात आले. सकाळी ८ ते सायंकाळी ८ या वेळेत गोपाळपूर, रिध्दी-सिध्दी मंदिर व दर्शन बारी, पत्रा शेड या ठिकाणी विद्यार्थी वारकऱ्यांना प्रचंड उत्साहाने आर.ओ. फिल्टर्ड पाण्याचे वाटप करत आहेत. नवमी, दशमी व एकादशी या तीनही दिवशी विद्यार्थी ग्लास, वॉटर जग आणि वॉटर टँकद्वारे पाणी वारकऱ्यांपर्यंत पोहचवून वारकऱ्यांची तहान भागवत आहेत. स्वेरीकडून दररोज साधारण आठ ते दहा हजार लिटर पाण्याचे वाटप केले जात आहे. या उपक्रमाच्या उदघाटनावेळी माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे म्हणाले की, 'स्वेरीचे विद्यार्थी हे अभ्यासक्रमात अग्रेसर आहेतच पण आता त्यांच्या हातून समाजकार्य ही उत्तम घडत आहे' असे म्हणून स्वेरीच्या समाजकार्याचे कौतुक केले. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार यांच्या सहकार्याने, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती, प्रा. ए.एस.भातलवंडे, प्रा. पी.एस.वलटे, रा.से.योजनेचे प्रा. आर.एस. साठे, डॉ.डी.एस. चौधरी, समन्वयक प्रा. एन.ए.शिंदे, 'कमवा व शिका'चे प्रा. ए.ए.पवार, विभागप्रमुख प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी वारकऱ्यांना पाणी वाटपाचे कार्य मनोभावे करत आहेत. कॉलेजमधून इतर सहकारी पाणी आणून दर्शन रांगेजवळ असलेल्या टाक्यात साठवतात. त्यानंतर 'राष्ट्रीय सेवा योजना' व 'कमवा व शिका' योजनेतील विद्यार्थी मोठ्या उत्साहाने वारकऱ्यांना पाणी वाटप करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रत्येक दिवशी २० प्राध्यापक व जवळपास १०० विद्यार्थी दिवसभर मोफत शुद्ध पाणी वाटप करत आहेत. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी या उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

### विनोद तावडेंच्या फेसबुक पेजवर स्वेरीचे कौतुकः

**राज्याचे माजी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी आपल्या फेसबुक पेजवरून स्वेरीच्या कार्याचे कौतुक करताना लिहिले आहे की, 'महाराष्ट्राच्या श्रद्धेचा आणि भक्तीचा सोहळा असलेल्या आषाढी एकादशी निमित्त लाखो वारकरी व भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला येतात. या विठू भक्तांना पिण्याच्या शुद्ध पाण्याचे मोफत वाटप करण्याचा अतिशय स्तुत्य उपक्रम पंढरपूरच्या श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित विविध महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने हाती घेण्यात आला आहे. या सेवाभावी उपक्रमाचे उदघाटन करण्याची संधी आज मला लाभली.'**

# सामाजिक बांधिलकीतून शैलेश दोंदे यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव : समता संघर्ष संघटन यांच्या वतीने संवाद चळवळीचा ३४ वा संवाद घेऊन आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शैलेश दोंदे यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकीतून साजरा करण्यात आला. यावेळी राजकीय विश्र्लेषक, पत्रकार चंद्रकांत सोनावणे यांनी संसदीय लोकशाहीतील निवडणुकीचे महत्व आणि आंबेडकरी दृष्टिकोन या विषयावर मार्गदर्शन केले.संवाद चळवळीचा हा कार्यक्रम महत्वाचा यासाठी आहे की, संवादाशिवाय मैत्री होत नाही, मैत्रीशिवाय बंधुता जागी होत नाही आणि बंधुताशिवाय समता येत नाही, असे सांगत आंबेडकरी चळवळीसाठी हा




कार्यक्रम संघटनात्मक रचनेसाठी एक पायाभूत अभियान आहे अशा शब्दांत पत्रकार चंद्रकांत सोनावणे यांनी कल्याण येथे संवाद चळवळीच्या अभियानाचे ३४ वे पुष्प गुंफताना आपले विचार मांडले.यावेळी सदानंद गायकवाड, अँड श्रीकांत कांबळे,दिपक टिके, अविनाश दोंदे, गणेश सोष्टे, कुंदन जाधव, अँड दिलिप वाळज, सचिन भोईर, राहुल वाघ, विकास जाधव,मिलींद जाधव,अक्षय भोईर,सुरेखा पैठणे, रोहित जाधव, सागर भोईर, दुहिदा जाधव, अँड सोनाली भगत, सुरज भालेराव, विशाल सोष्टे, किशोर सावंत, विशाल जाधव, कृष्णा गायकवाड, अशोक भोये तर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शैलेश दोंदे यांना शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा पैठणे यांनी केले.

# डुबेरे येथील जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनुभवला रिंगण सोहळा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सिन्नर/प्रतिनिधीः डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यालयाच्या प्रागणांत आकर्षक व सुंदर गोल रिंगण केल्याने विद्यार्थ्यांसह पालकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

सर्वप्रथम आकर्षक सजावट केलेल्या पालखीत ठेवलेल्या विठुरायाच्या मूर्तीची व ग्रंथांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शालेय समितीचे सदस्य भाऊ रखमा वारुंगसे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे,सचिन वामने,अर्चना ढोली,चित्रा पडवळ ,मुख्याध्यापक रामदास वाजे आदींच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन करण्यात आले.उपशिक्षिका भारती निखाडे यांनी विद्यार्थ्यांना आषाढी

एकादशीचे महत्व सांगितले . यावेळी केलेल्या गोल रिंगणात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी नाचून फुगडीचा आनंद घेतला.विद्यालयातील जवळपास ४०० विद्यार्थ्यांनी वारकरी पोशाख परिधान केला होता. ह.भ.प किरण महाराज वाजे ,सुयोग महाराज वाजे, उमाकांत महाराज ननावरे ,निवृत्ती बर्गे ,पंकज भालेराव, ऋषिकेश कुंदे यांनी दिंडीत सक्रीय सहभाग घेऊन भजन व अभंग गाऊन रंगत आणली.



टाळ- मृदुंगाच्या गजरात संपूर्ण गावातून दिंडी काढण्यात आली.दिंडीला विद्यालयातील लेझीम पथकाने उत्कृष्ट साथ दिली.गावात ठिकठिकाणी पालखीचे पूजन करण्यात आले. गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्रभारी मुख्याध्यापक रामदास वाजे केले.

दिंडीचे आयोजन व सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत,संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके,शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सोमनाथ गिरी,शिवनाथ हुजरे ,सुनिल ससाणे,सोमनाथ पगार,दिंगबर जाधव,डी.रबडे,सीमा गोसावी,शिवाजी गुरुळे,रामदास वारुंगसे,सुषमा थोरात,कचेश्र्वर शिंदे, रेवणनाथ कांगणे ,सुदाम वारुंगसे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.